आजचा दिनविशेष
१९९९: लेखक व्यंकटेश माडगूळकर यांना कुसुमाग्रजा प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार जाहीर.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 | All Tours घर से घर तक | दिल से दिल तक | I'TIME in TRAVEL INDUSTRY | www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १८ सप्टेंबर २०२५ | अंक २६९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक दिवस-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ

बीड,दि.17 (जिमाका) : अनेक दशकांपासून बीडच्या जनतेने प्रतीक्षा केलेली रेल्वे आज बीड येथून सुरू झाली असून, बीडकरांना ऐतिहासिक भेट देत रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवंगत गोपीनाथराव मुंडे, केशरकाकू क्षीरसागर यांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले.

अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून केला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, मध्य रेल्वे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा आदी उपस्थित होते.

**आजचा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा**

रेल्वे संघर्ष समितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज हा दिवस शक्य झाल्याचे सांगुन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, "हा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा आहे. बीडमध्ये रेल्वे सुरू होणे म्हणजे फक्त गाडी पोहोचणे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचणे आहे. सन 2014 नंतर आमच्या सरकारने या प्रकल्पाला गती दिली. केंद्र व राज्याने 50 टक्के हिस्सा देत प्रकल्प पूर्णत्वाकडे नेला. रेल्वेचे विद्युतीकरणही



लवकरच पूर्ण होईल आणि यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेगाने होईल." असे ते म्हणाले.

**मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध**

मराठवाडा मुक्ती दिन आणि रेल्वे प्रकल्पाचा आनंद दुहेरी असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्यासाठी रेल्वे प्रकल्पांना तब्बल 21 हजार कोटी रुपये दिले. ज्यामुळे विकासाच्या दिशा खुल्या झाल्या. सरकार मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध असून, पाण्याचे जाळे निर्माण करण्यासाठी कृष्णा व उल्हास खोऱ्यातील पाणी आणण्याचे मोठे प्रकल्प राबवले जातील." असे त्यांनी सांगितले.

**बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय**

उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले की, आता जनतेचे प्रश्न सोडवायाचे आहेत. 30 ते 35 वर्षांनी रेल्वेचे हे काम झाले आहे. या कामासाठी विलंब झाला आहे. यासाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पुर्वीचा काळ व आजचा काळ यामध्ये मोठा फरक आहे. आज कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर होत आहे. ही रेल्वे पुणे आणि पुढे मुंबई पर्यंत घेवून जाण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील कोणतीही विकास कामे अडणार नाही याकडे लक्ष देण्यात येईल. रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले असून आता विमानतळाकडे आपले लक्ष आहे. जिल्ह्यात उद्योगपती आल्यास उद्योग स्थापन करुन रोजगार उपलब्ध होतील. बीडमधील गोरगरिबांना उपचारासाठी मुंबई-पुण्याला जाण्याची आवश्यकता पडणार नाही. यासाठी येथेच आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विकास करत असतांना त्यातुन मार्ग काढावा लागतो, असे सांगुन श्री. पवार म्हणाले, बीड जिल्ह्याच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. मोठ्या शहरातील रस्ते, मेट्रो, विमानतळ यासारख्या प्रकल्पाकडे लक्ष देत असतांना आमच्या ग्रामीण भागाचासुध्दा विकास झाला पाहिजे या दृष्टीने ग्रामीण भागातही रस्ते, दळणवळणासारख्या पायाभुत सुविधांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या रेल्वेच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विकासाचा, समृध्दीचा नवा अध्याय लिहिला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे 10 हजार कोटी रुपये निधी

मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीड येथे रेल्वेसाठी सर्व लोकप्रतिनीधीनी पुढाकार घेतला. रेल्वे ही नागरिकांच्या उन्नतीसाठी असणे आवश्यक आहे. विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे यांनी मराठवाड्यात रेल्वे आली पाहिजे यासाठी पुढाकार घेतला. बीड जिल्हा कष्टकऱ्यांचा आणि स्वाभिमानी लोकांचा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे 10 हजार कोटी रुपये निधी दिला. बीडला रेल्वे यावी यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले. जिल्ह्याच्या विकासासाठी आपलेही योगदान देण्याची तयारी आहे. जिल्ह्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कृपादृष्टी ठेवावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आजचा दिवस मराठवाड्याच्या रेल्वेच्या इतिहासातील स्वर्णीम दिवस आहे. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मिणा यांनी केले. डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व 241 पोलीस निवासस्थानाचे उद्घाटन प्रारंभी मंचावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व 241 पोलीस निवासस्थानाचे उद्घाटन ऑनलाईन पध्दतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कार्यक्रमाला लोकप्रतिनीधी, विविध विभागाचे अधिकारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपत्ती व्यवस्थापन2005 कायद्यानूसार नूकसान ग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ वैयक्तिक अर्थ सहाय्य करावे - शेख अजिमोद्दीन

कडा (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य अतीवृष्टी झाल्याने आष्टी, शिरूर, माजलगाव, अंबाजोगाई, धारूर, गेवराई, तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेती,पीके,घर,जनावरे,कांदाचाळ, फळबागा, भाजीपाला इ.नेस्तनाबूत झाले आहे. आष्टी तालुक्यात लष्कर व एनडीआर एफ टीमने हेलीकॅप्टरच्या सहाय्याने पूरात अडकून पडलेल्या शेतकऱ्यांना बाहेर काढले. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नूसार आपत्ती काळात क्षतीग्रस्तांना व मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींना वैयक्तिक अर्थ सहाय्य तात्काळ करता येते.आपत्ती व्यवस्थापन



कायदा २००५ नूसार आपत्ती वेळी तात्काळ आर्थिक सहाय्य केले जाते.

हा कायदा आपत्कालीन परिस्थीतीला प्रतीसाद आणि आपत्तीमूळे झालेले नूकसान कमी करण्यासाठी पूरेशी आर्थिक तरतूद सुनिश्चित करतो. आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रक्रियेमध्ये आपत्ती नंतरच्या कार्यवाहीचा समावेश असतो, ज्यामध्ये बाधित व्यक्तींना आर्थिक मदत देणे समाविष्ट आहे. आपत्ती नंतरच्या कार्यवाहीमध्ये बाधीत लोकांना त्वरित मदत देणे हे एक महत्त्वाचे काम आहे असे कायद्यात नमूद केलेले आहे. तसेच कर्जवसुलीसाठी स्थगिती व नवीन कर्ज देण्यात यावेत अशी ही तरतूद आहे.तरी बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आपत्ती व्यवस्थापन कायद्यानूसार आर्थिक सहाय्य करण्यात यावे. त्यामध्ये प्रामुख्याने फळबागां, भाजीपाला, सोयाबीन,ऊडीद,ऊस,कांदा, कांदाचाळ,मका, जनावरे ,गायगोठे, घरे, पोल्ट्री फार्म, तसेच जिवीत हानी झालेल्या कूटूंबाना अर्थ सहाय्य तात्काळ करण्यात यावे. व्यक्तीगत पंचनामे करून २००५आपत्ती व्यवस्थापन कायद्यानूसार तात्काळ आर्थिक सहाय्य करावे अशी मागणी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे.

# बीड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा फटका.

## तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या- गोकुळ इंगोले यांची मागणी

आष्टी मतदार संघात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला असून नद्या नाले विहिरी तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. तसेच शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे व पिकांचे पंचनामे करून अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाला व विमा कंपन्यांना लवकरात लवकर सादर करावा अशी मागणी प्रशासनाला केली आहे. गेल्या दोन-तीन दिवसात महाराष्ट्रात अतिवृष्टीच्या पावसामुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक गोरगरीब शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत. शेतकऱ्यांच्या घरासह पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या आणि कृषी विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावीत तसेच घरांचे स्थळ पंचनामे करून त्याचा अहवाल राज्य शासनाला पाठवा अशी मागणी गोकुळ इंगोले यांनी केली आहे.



# रेल्वे आली.. विमान पण येणार... पण रस्त्याचे काय ? शेख युनूस



बीड ( प्रतिनिधी) बीड शहरात तीन पिढ्या नंतर रेल्वे आली, विमान पण येणार पण साहेब रस्त्याचे काय? बीड शहरात एक पण रस्ता धड नाही. जागोजागी रस्त्याची दूरावस्था झालेली असून नागरिकाला चालताना नाहक त्रास सहन करावे लागत आहे.

म खड्ड्यात रस्ता आहे, की रस्त्यात खड्डे म हे सम जत नाही. दिवसेंदिवस रस्त्याची स्थिती बिकट होत असून याकडे जाणून-बुजून लोकप्रतिनिधी तसेच प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. गल्लीबोळ्यातील रस्ते तर सोडा मेन रोड सुद्धा नीट राहिलेले नाही. नागरिकाची अपेक्षा आहे याकडे आता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड पालकमंत्री अजित दादा पवार साहेब आपण लक्ष द्यावे,हीच जनतेची अपेक्षा आहे .

# मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यात बीड जिल्ह्याचे अमूल्य योगदान: प्राचार्य राजकुमार कदम.

येळंब (घाट) दिनांक 17 सप्टेंबर: मराठवाडा मुक्तीलढा देशाच्या स्वातंत्र्यानंतर जनतेने लढवलेला पहिला स्फूर्तिदायक लढा असून या लढ्यात बीड जिल्ह्याचे अमूल्य योगदान असल्याचे प्रतिपादन बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य राजकुमार कदम यांनी केले.

येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज दि.17 सप्टेंबर 2025 रोजी मराठवाडा मुक्ति संग्रामदिना निमित्त प्राचार्य राजकुमार कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशालेच्या प्रांगणात पार पडलेल्या गावातील प्रमुख ध्वजारोहण ध्वजारोहण प्रसंगी ते बोलत



होते. प्रारंभी इयत्ता पाचवी ते बारावी तील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर घोषणांनी सजलेल्या प्रभातफेरीने संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. याप्रसंगी '100 तास स्वच्छते'साठी ही शपथ उपस्थित सर्व मान्यवरासह विद्यार्थ्यांना देण्यात आली तर शालेय क्रीडा स्पर्धेसाठी जिल्हास्तरावर निवड झालेल्या प्रशालेच्या विद्यार्थिनींचे त्यांच्या मार्गदर्शक क्रीडा शिक्षक श्री मोहिते एम. व्ही. यासोबत अभिनंदन व कौतुक करण्यात आले. याप्रसंगी बोलताना प्राचार्य श्री राजकुमार कदम यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाची संघर्षगाथा , बलिदान शौर्य व लोह पुरुषाची सिद्धता याविषयी माहिती देतानाच मुक्तीसंग्राम लढ्यातील बीड जिल्ह्याचे व येळंब (घाट) पंचक्रोशीने दिलेल्या योगदानाचे सविस्तर विवेचन केले.सोहळ्यात प्रशालेचे माजी प्राचार्य श्री रामहरी कदम,श्री खाकरे बी. के.,माजी उप मुख्याध्यापक श्री टेकाळे जे.डी.श्री राम कदम,यासह येळंब (घाट) गावचे सरपंच,उप सरपंच, माजी सरपंच,उप सरपंच ग्रा. पं.सदस्य,विविध पदाधिकारी, माजी सैनिक,सेवा निवृत्त कर्मचारी,तलाठी, ग्रामसेवक,पत्रकार, व शिक्षण प्रेमी नागरिक ,सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन श्री.घाटे ए. एस. यांनी केले तर आभार श्री सोंडगे बी. बी. यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व लिपिक श्री सुधीर पायाळ,श्री.लहाने डी. एस. ,श्री सोनटक्के एस. डी. आणि श्री मोहिते एम. व्ही.,श्री भोसले ए.एन. श्रीमती गणगे व्ही. एम. श्रीमती सरवदे सी. जी. यासह सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.
मुख्याध्यापक/ प्राचार्य
बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालय.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १८ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

### पावसाळ्यात पिठात किडे होण्यामुळे वैतागला आहात? पिठात ही गोष्ट ठेवा, काही मिनिटांतच समस्या सुटेल



पावसाळ्यात शक्यतो कोणत्याही पिठात किडे होण्याची समस्या समोर येतेच. किड्यांचं प्रमाण पिठात एवढ वाढतं कि ते पीठ शेवटी फेकून देण्याव्यतिरिक्त कोणताही मार्ग समोर राहत नाही. पण एक उपाय असा आहे ज्यामुळे ही समस्या चुटकीशीर दूर होऊ शकते. चला जाणून घेऊयात. जर तुमच्या पीठात किडे होत असतील तर पहिला आणि सोपा उपाय म्हणजे ते नेहमी हवाबंद डब्यात साठवणे. हवेतील ओलाव्यामुळे कीटकांची पैदास लवकर होते. जर तुम्ही पीठ सैल पॅकेटमध्ये किंवा उघड्या डब्यात साठवले तर ते संक्रमित होण्याची शक्यता जास्त असते. म्हणून, पीठ स्टील, प्लास्टिक किंवा काचेच्या हवाबंद डब्यात साठवा. यामुळे ते सुरक्षित राहील. एक प्रभावी घरगुती उपाय

भुंग्यांपासून किंव्या किड्यांपासून पीठाचे संरक्षण करण्यासाठी आणखी एक प्रभावी घरगुती उपाय म्हणजे तमालपत्र किंवा कडुलिंबाची पाने वापरणे. पिठाच्या डब्यात काही वाळलेली तमालपत्र किंवा कडुलिंबाची पाने ठेवा. त्यांचा सुगंध आणि गुणधर्म भुंग्यांना प्रजनन करण्यापासून रोखतात आणि पीठ जास्त काळ सुरक्षित राहते. किड्यांची वाढही होत नाही.

पिठाच्या डब्यात 2-3 सुक्या लाल मिरच्या किंवा 4-5 लसणाच्या पाकळ्या ठेवा

प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात आढळणारे मसाले देखील भुंग्यांपासून पीठाचे संरक्षण करण्यासाठी खूप उपयुक्त आहेत. पिठाच्या डब्यात 2-3 सुक्या लाल मिरच्या किंवा 4-5 लसणाच्या पाकळ्या ठेवा. त्यांचा तिखट वास भुंगे आणि लहान कीटकांना दूर ठेवतो. ही एक पूर्णपणे सुरक्षित पद्धत आहे आणि पीठाच्या चवीवर परिणाम करत नाही. ही पद्धत भुंग्यांना तुमच्या पीठात पाण्याने प्रवेश करण्यापासूनही रोखते.

पीठ उन्हात वाळवा

पिठाला जर ओलावा असेल तरीदेखील पीठात किडे किंवा भुंगे येतात. जर तुमचे पीठ थोडेसे ओले दिसत असेल तर ते ताबडतोब उन्हात वाळवा. सूर्याच्या उष्णतेमुळे ओलावा निघून जातो, ज्यामुळे भुंगे,किडे येण्याची शक्यता कमी होते. दर 15-20 दिवसांनी थोड्या वेळासाठी पीठ किंवा पिठाचा डबाच सूर्यप्रकाशात ठेवण्याचा प्रयत्न करा,त्यामुळे देखील ओलावा निघून जाण्यास मदत होते.

पीठ सरळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा

जर तुम्हाला पीठ जास्त काळ साठवायचे असेल तर ते रेफ्रिजरेटरमध्ये ठेवणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

# बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी “जलसमाधी आंदोलन

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तुर्तास स्थगित :- बाळासाहेब मोरे पाटील

बीड:- ( दि.१७)बीड रेल्वे स्थानकाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचच्या वतीने पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले. प्रशासनाकडून ठोस लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन काही काळाने स्थगित करण्यात आले.

आज दि.१७ सप्टेंबर मराठवाडा





मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत” हिरवा झेंडा” दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. मात्र, बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. ही मागणी लवकरात लवकर मान्य व्हावी, यासाठी पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन छेडण्यात आले. रेल्वे स्थानकाला लोकनेत्यांचे नाव दिल्यास सामाजिक ध्रुवीकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोक नेत्यांच्या नावाविषयी मतभेद आहेत परंतु महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला अद्याप कोणीही विरोध केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला जिल्हा वासियांची पसंती असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले. १७ सप्टेंबर रोजी झालेल्या या आंदोलनावेळी पाली गावचे तलाठी अनिल गायकवाड, मंडळ अधिकारी शीतल चाटे, पोलीस उपनिरीक्षक नितीन काकरवाल, पो. कॉ. दुबाले, बाबर, जायभाय, तसेच आम आदमी पार्टी बीड जिल्हाध्यक्ष अशोक येडे, बीड शहराध्यक्ष सय्यद सादेक, रासप बीड तालुकाध्यक्ष बाबासाहेब सापणकर, रामहरी चाळक अंजनवतीकर आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची उपस्थिती होती. प्रशासनाने या मागणीसंदर्भात सकारात्मक भूमिका घेतल्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन काही वेळाने स्थगित करण्यात आले. मात्र, जर मागणी पूर्ण न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील क्रांतीकारकांनी ध्येयनिष्ठेने निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या: श्री नामदेवराव वाघ

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा !

बीड दि. १७ (प्रतिनिधी): मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील क्रांतीकारकांनी ध्येयनिष्ठेने निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या होत्या. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि मराठवाडा मुक्ती लढ्यात बलिदान देणा-या थोर देशभक्तांनी केलेले कार्य आणि त्यांनी दाखवलेला मार्ग प्रत्येक नागरिकांनी आपल्या जीवनात अंगिकारून उज्वल जीवन जगावे असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री नामदेवराव वाघ यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी ध्वजारोहण गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री पांडुरंग भाऊ शेंडगे, श्री आकाश भाई निर्मळ, श्री दत्तात्रय चव्हाण, श्री आत्माराम वाव्हळ आदी उपस्थित होते.

बीड शहरात पासून जवळच असणाऱ्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम लढल्याचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्या नंतर आलेल्या मान्यवरांच्या स्वागत समारंभ नंतर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना विषयी शाळेतील विद्यार्थीनी कु. श्रेया



कदम हिने विचार मांडले. तर इयत्ता नववीच्या विद्यार्थीनी कु. श्रेया कदम कु. अक्षरा साळुंके, कु. अक्षरा मस्के कु. प्रीती कांबळे यांनी देशभक्ती गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्या नंतर शेकापचे भाई आकाश निर्मळ आणि श्री गणेश आबा कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे सचिव श्री नामदेवराव वाघ सर यांनी म्हणाले की, मराठवाडा मुक्त करण्याच्या या लढ्यामागे क्रांतीकारकाच्या मनात एक मोठी प्रेरणा होती. या प्रेरणेतून त्यांच्या अंगी धैर्य,शौर्य निर्माण झाले. या ध्येयनिष्ठेने त्यांनी निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या. या कार्यात गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी खंबीर भूमिका घेतली होती. खंबीर व पोलादी मन असणाऱ्या महापुरुषांचा, आदर्श देशभक्तांचा त्यांनी केलेले कार्य आणि त्यांनी दाखवलेला मार्ग आज प्रत्येकांनी आपल्या जीवन अंगिकारून उज्वल जीवन जगावे असे आवाहन श्री नामदेवराव वाघ यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री वाव्हळ सर यांनी तर आभार श्री चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम श्रीमती सानप मॅडम श्री गणेश गुजर यांच्या सह शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### सामाजिक कार्यकर्ते भाई आकाश निर्मळ यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार!

शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2025 मध्ये श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या कु. अनुष्का धुमाळ, द्वितीय क्रमांक मिळवणारा मुळे, तृतीय क्रमांक मिळवलेल्या चिरंजीव शरद शेंडगे आणि चौथा क्रमांक मिळालेल्या कु. सपना शिंदे या विद्यार्थ्यांना शिदोड चे भूमिपुत्र तथा सध्या रायगड येथे स्थायिक झालेले सामाजिक कार्यकर्ते श्री आकाश भाई निर्मळ यांच्यावतीने स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वांना या गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# माहिती अधिकार महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन सोलापूर येथे संपन्न; उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून डॉ.गणेश ढवळे

बीड (दि.१७): माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (फेडरेशन) ही महाराष्ट्रातील जागरूक नागरिक व माहितीं अधिकार कार्यकर्त्यांची सर्वात मोठी संघटना असून, महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन दि.१४ सप्टेंबर रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. या अधिवेशनासाठी राज्यातील ३५ जिल्ह्यांतील शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. अधिवेशनाचे उद्‌घाटन नाशिकचे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व निर्भय महाराष्ट्र पार्टी चे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या हस्ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलीत करून करण्यात आले. शासन व प्रशासन भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक करण्यासाठी संघर्ष करणे, तसेच निर्भयपणे लढा उभारण्याचे आवाहन त्यांनी या प्रसंगी कार्यकर्त्यांना केले. महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी शासनाच्या विभागातील अनेक ज्वलंत प्रश्नांवर त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येत असल्याबाबत चर्चा





करण्यात आली.कारवयकरत्यावर होत असलेले हल्ले, खोट्या केसेस तसेच अन्याय होईल तिथे आपली एकजूट दाखवून लढा द्यावा.असे प्रतिपादन केले.

या अधिवेशनात विविध सामाजिक विषयांवरील अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सोडविणाऱ्या बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता व मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना उद्‌घाटक जितेंद्र भावे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते हरिओम क्षीरसागर, जावेद सिद्दीकी आदी मान्यवर उपस्थित होते.या अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# चंद्र या उपगृहाचा इतिहास व विज्ञान समृद्ध व रोचक आहे - डॉ अमृतांशु वाजपेयी

माजलगाव -येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव च्या विज्ञान मंच व विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ङ्गओळख भारतीय ज्ञान, विज्ञान परंपरेची ङ्ख्या सहा दिवसीय व्याख्यान माले तील तिसरे पुष्प गुंफताना प्रमुख व्याख्याते प्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर अमृतांशु वाजपेयी यांनी चला चंद्राविषयी बोलूया – आकाशातील एम फॅक्टरचा शोध या विषयावर दि. १७ सप्टेंबर बुधवार रोजी विचार मांडताना चंद्राविषयीच्या आकर्षक गोष्टी, चंद्राच्या विविध कला, पाण्याची उपलब्धता यावर





त्यांनी सविस्तर पावर पॉइंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून भाष्य केले.

१९६९ मध्ये नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पहिले पाऊल टाकताना चंद्रावरील पाण्याची स्थिती, उल्कापातानी पडलेला प्रभाव, चंद्रावरील वेळेची स्थिती यावर ऑनलाइन व्याख्यानातून मार्गदर्शन केले. चंद्राच्या एम फॅक्टरचा प्रभाव म्हणजे चंद्राचा आकार, वस्तुमान किंवा गुरुत्वाकर्षण यांचा उल्लेख त्यांनी केला.

चंद्रावरील गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या सुमारे १/६ पट आहे. चंद्राच्या विविध कलांबद्दल माहिती देताना परिभ्रमण आणि पृथ्वी, चंद्र आणि सूर्य यांच्या सापेक्ष स्थितीमुळे निर्माण होणारी अवस्था याचे त्यांनी वर्णन केले. चंद्र एका विशिष्ट स्थितीत असतो तेव्हा त्याचा प्रकाशमान भाग आपल्याला मोठा किंवा लहान दिसतो. या वाढत्या किंवा कमी होणाऱ्या प्रकाशमान भागांनाच चंद्राच्या कला म्हणतात असे त्यांनी सांगितले.

या व्याख्यानाचे सूत्रसंचालन विज्ञान विभाग प्रमुख डॉ.शिवशंकर मिटकरी यांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनायक देशमुख यांनी केले. मान्यवरांचे आभार प्रा. गोविंद नागरगोजे यांनी मानले. या ऑनलाईन सत्राची नियोजन भौतिकशास्त्र विभागाने केले होते. या व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे व विज्ञान मंच प्रमुख डॉ. विकास बोरगावकर यांनी केले. तंत्र सहाय्य डॉ. सचिन दाभाडे व श्री. सुधीर काळे यांनी केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १८ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## पंतप्रधान मोदींच्या फिटनेसचे रहस्य ही खास भाजी; जी प्रत्येकाच्या घरात बनते, म्हणून वयाच्या 75 व्या वर्षीही इतके तंदुरुस्त



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्यांचा 75 वा वाढदिवस असून ते या वयात देखील तेवढेट फिट आहेत. कारण तरुणांना लाजवेल अशी त्यांची एनर्जी आहे. पंतप्रधान मोदींची ऊर्जा, शिस्तबद्ध दिनचर्या आणि निरोगी खाण्याच्या सवयी सर्वांनाच आश्चर्यचकित करतात. सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान बनलेले नरेंद्र मोदी या वयातही इतके उत्साही आणि फिट कसे राहतात याचा प्रश्न सर्वांनाच पडतो. पण पंतप्रधान मोदींच्या तंदुरुस्ती आणि उर्जेमागील रहस्य त्यांची शिस्तप्रिय दिनचर्या तर आहेच पण सोबतच एक भाजी आहे जे नेहमी आहारात समाविष्ट करतात त्यामुळे ते नेहमीच तंदुरुस्त राहतात. पंतप्रधान मोदींच्या दैनंदिन दिनचर्येत लवकर झोपणे आणि लवकर उठणे ही सवय समाविष्ट आहे. ते पहाटे 4 वाजता अंथरुणातून उठतात. ते त्यांच्या सकाळची सुरुवात योगासने, सूर्यनमस्कार, ध्यान, चालणे आणि हलका व्यायाम करून करतात. यामुळे त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य दोन्ही राखण्यास मदत होते.

सात्विक संतुलित आहार

नरेंद्र मोदींचा आहार अत्यंत साधा आणि सात्विक असतो. आजच्या तरुणांना आवडणारे जंक आणि तेलकट पदार्थ ते अजिबात खात नाही. मुख्य म्हणजे ते कमी मीठ आणि साखरेचा आहार घेतात. अनेक मुलाखतींमध्ये, पंतप्रधान मोदींनी स्वतः हे सांगितले आहे की त्यांच्या आहारात हंगामी फळे आणि हलके जेवण असते. जसे की, खिचडी, मसूर, भाज्या, अंकुरलेले धान्य, दही आणि ताक यासारखे पारंपारिक भारतीय पदार्थ त्यांच्या आहाराचा भाग असतो. त्यातल्या त्यात मोदींना विशेषतः मोरिंगा ज्याला शेवग्याच्या शेंगांची भाजीही म्हणतात. ती त्यांना खाणे फार आवडते. ते अनेकदा त्यांच्या जेवणात या भाजीचा समावेश करत असतात. जेणेकरून त्यांना भरपूर ऊर्जा मिळेल.

कोमट पाणी

हिवाळा असो किंवा उन्हाळा, पंतप्रधान मोदी वर्षभर नेहमीच कोमट पाणी पितात. कोमट पाणी पिल्याने पचनक्रिया व्यवस्थित राहण्यास मदत होते. त्यामुळे ते नेहमी कोमट पाणी पितात

शिस्तबद्ध दिनचर्या

पंतप्रधान मोदी कितीही व्यस्त असले तरी ते त्यांच्या दिनचर्येत कधीही तडजोड करत नाहीत. वेळेवर झोपणे आणि उठणे हे त्यांच्या तंदुरुस्तीचे एक महत्त्वाचे रहस्य आहे. ते घरी असोत किंवा परदेशात, पंतप्रधान नेहमीच संतुलित आणि शिस्तबद्ध दिनचर्या पाळतात. आणि समजा कामामुळे त्यांना झोपण्यास उशीर झाला तरी ते सकाळी लवकरच उठतात आणि त्यांची दिनचर्या पाळतात.उपवास करतात

पंतप्रधान मोदी त्यांच्या इंद्रियांना जागृत करण्यासाठी उपवास करतात. त्यांनी एका मुलाखतीत हे सांगितले होते की जेव्हा तुम्ही उपवास करता तेव्हा तुमची सर्व इंद्रिये जास्त सक्रिय होतात. त्यामुळे तुम्हाला मग नंतर तुम्हाला पाण्याचा वास देखील येऊ शकतो आणि चहा पिऊन कोणी व्यक्ती तुमच्या शेजारून गेला तरी ते तुम्हाला जाणवते.

# बीडला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी आणणार उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजीत पवार

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ध्वजारोहण कार्यक्रम





- विविध योजनांच्या लाभाचे वाटप
- सेवा पंधरवडा शुभारंभ
- कुणबी प्रमाणपत्राचे वितरण
- सर्वांसाठी घरे - जमिनीचे पट्टे वाटप
- पोलीस विभागाच्या नवीन वाहनाचे लोकार्पण

बीड दि.17(जिमाका): जिल्ह्यातील प्रत्येक कुटूंबाचे स्वतःचे घर असले पाहिजे हे आपले ध्येय आहे. जिल्ह्यात विविध उपक्रम आणि प्रकल्पाच्या माध्यमातून बीडच्या विकास यात्रेची नवी सुरुवात झाली आहे. आपण सर्वजण मिळून जिल्ह्यात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती-उद्योग-शिक्षण-आरोग्य-पर्यावरणासह सर्वच क्षेत्रात बीड जिल्ह्याला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी आणणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजीत पवार यांनी दिली.

आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पोलीस मुख्यालयाच्या पोलीस कवायत मैदानावर राष्ट्रध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना श्री. पवार बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. श्री. पवार म्हणाले, मराठवाडा मुक्तीसंग्राम हा मराठवाड्यातील जनतेचा लढा होता. अंबाजोगाई आणि बीड या लढ्याचा केंद्रबिंदू होता. हा लढा लोकांनी त्यांच्या गावा-गावात लढवला. या लढ्यात मराठवाड्यातील सामान्य शेतकरी, कष्टकरी, महिला मोठ्या संख्येने सहभागी होते, त्यासाठी त्यांना मोठी किंमत चुकवावी लागली. हा संघर्ष केवळ राजकीय नव्हता तर तो सामाजिक समतेचा, स्वाभिमानाचा आणि स्वातंत्र्याचा लढा होता असे सांगितले.

जिल्ह्याच्या विकासाबाबत बोलताना श्री. पवार म्हणाले की, मागील काही महिन्यात आपण अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहे. बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेतला आहे. जिल्ह्यातील युवकांना तंत्रज्ञान आधारित कौशल्य मिळावे म्हणून सिट्रीपलआयटी प्रकल्प उभारणीस गती देण्यात आली आहे. टाटा टेक्नॉलॉजीज आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने 196 कोटी 98 लक्ष रुपयांचा हा प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात साकारणार असल्याचे ते म्हणाले. श्री. पवार पुढे म्हणाले, आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर बीड-अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत आहे. दोन दिवसांपूर्वीच अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या उर्वरित कामासाठी 150 कोटी निधी वितरीत केला आहे. परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला सुधारीत 351 कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. बीडच्या श्री कंकालेश्वर मंदिर परिसराचा विकास करण्यात येणार आहे. नवीन प्रशासकीय इमारत बीड येथे उभारण्यात येणार आहे. सहकार भवनाचीही इमारत उभारण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त 25 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. परळीत नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी 550 कोटी रुपये मंजूर केले असल्याचे श्री. पवार म्हणाले. जिल्ह्यात पोलीस विभागाच्या विविध उपक्रमांमुळे नागरिकांचा विश्वास वाढला असून, गंभीर गुन्ह्यात घट झाली असल्याचे सांगून श्री. पवार म्हणाले की, जिल्ह्यात कायदा - सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी दर्जेदार वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. अंबाजोगाई वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे पालकमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले. मागणी दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्याला मुसळधार पावसाचा तडाखा बसल्याचे सांगून श्री. पवार म्हणाले की, पुरामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली, त्यामुळे जिल्ह्यातील काही नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करावे लागले. या परिस्थितीवर माझे मंत्रालयातून बारकाईने लक्ष होते. जिल्ह्यातील या परिस्थितीची माहिती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेत होतो. पूरग्रस्तांना आणि बधितांना तातडीने मदत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिकांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतपिकांचे आणि पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शासन शेतकरी आणि पशुपालकांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची ग्वाही श्री. पवार यांनी यावेळी दिली.

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पालकमंत्री श्री. पवार यांनी ध्वजारोहण करुन, राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. तसेच यावेळी पथ संचलनाचे निरीक्षण केले.

प्रारंभी पालकमंत्री श्री. पवार यांनी प्रियदर्शनी उद्यानातील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोक धून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली.

### योजनांच्या लाभाचे वाटप व विविध क्षेत्रातील व्यक्तीचा सत्कार

यावेळी पालकमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आत्महत्या केलेल्या किंवा मृत्युमुखी पडलेल्या धीरज म्हस्के, महेश शेळके, सुनील वाकुरे आणि भागवत गायके यांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. संजय मोरे, वसीम खान, मनीषा मस्के, कमलाक्षी देशमुख व अयोध्या बांगर यांना कायम शिक्षकांचे आदेश वाटप केले. यावेळी नैसर्गिक आपत्तीमध्ये पुरात वाहून गेलेल्या व्यक्तींचे बचाव कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे, सिरसाळाचे मंडळ अधिकारी उमेश कुदळे, नाथ्राचे ग्राम महसूल अधिकारी कृष्णा मुंडे, परळी तहसीलचे महसूल सहाय्यक वसीम शेख, रामेवाडीचे राजाभाऊ पौळ, बाबूराव रुपनर, खामगावचे रुपचंद लाकडे, छोटुराम लाकडे, मारुती लाकडे, रूपेश लाकडे, दत्तात्रय गव्हाणे, दिलीप राठोड यांचा, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा शुभारंभ करुन लाभार्थ्यांना लाभ वाटप करण्यात आले. हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्र सतीष कदम, बाबुराव डोके, रघुनाथ कदम, व सतीष जाधव यांना वितरण करण्यात आले. सर्वांसाठी घरे या योजने अंतर्गत वाटप केलेल्या / अतिक्रमण नियमानुकल केलेल्या बप्पा ऊपळकर, अमजद पठाण, प्रकाश नरनाळे, बाबू मामडे, रियाज चाँद, गौतम साबळे, अशोक लोखंडे, संभाजी वाघमारे, कमलाकर वाघमारे, अशुकेत वैरागे, हनुमान वाघमारे, दिपक वाघमारे, सुनिल वाघमारे, अमोल वाघमारे, गोविंद वाघमारे यांना जमीनीचे पट्टे वाटप करण्यात आले. पाणंद रस्ते सातबारावर नोंदी घेतलेले व सातबारा व फेरफार वाटप विष्णु दुसांगे, संदिप महारनोर, असराबाई खेडकर यांना करण्यात आले. यावेळी पोलीस अधिक्षक कार्यालयास प्राप्त झालेल्या 45 वाहनांचे व नगर परिषद बीड यांनी खरेदी केलेल्या वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

# सांडस चिंचोली गावाला बेटाचे स्वरूप –

## मंत्री पंकजा मुंडे यांच्या सूचनेनुसार ड्रोनद्वारे औषध गोळ्यांचे वितरण

माजलगाव प्रतिनिधी : तालुक्यातील सांडस चिंचोली गावाला महापुरामुळे बेटाचे स्वरूप प्राप्त झाले असून गावाचा संपर्क तुटल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. या परिस्थितीची तात्काळ दखल घेत लोकनेत्या, ग्रामविकास मंत्री नामदार पंकजा मुंडे यांनी प्रशासनाला उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.



याअनुषंगाने आज मंगळवारी ड्रोनच्या साहाय्याने गावात आवश्यक औषध गोळ्यांचे वितरण करण्यात आले. याबाबतची माहिती जळगाव मंडळ अध्यक्षा रूपाली शरद कचरे यांनी दिली. मागील तीन दिवसांपासून पूरपाण्याच्या विळख्यात अडकलेल्या सांडस चिंचोलीतील ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने जलदगतीने ही मोहीम राबवली. “ग्रामस्थांनी कोणत्याही प्रकारची काळजी करू नये, प्रशासन आपल्या सोबत ठामपणे उभे आहे,” असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. औषध वितरणाच्या वेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील किट्टी आडगाव मंडळ माजलगाव तालुकाध्यक्ष रूपाली शरद कचरे, शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, तालुका सरचिटणीस प्रदीप जाधवर,सुखदेव माने, डॉ. प्रशांत पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

# खा.सोनवणे म्हणाले, रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय आता पाणी द्या, अन् फडणवीसांकडून दुष्काळमुक्तीचा शब्द



## रेल्वे मार्ग उद्घाटन अन् रेल्वे शुभारंभ प्रसंगी खा.सोनवणेंचे धडाकेबाज भाषण

बीड: बीडला रेल्वे यावी, यासाठी बीड जिल्हा रेल्वे कृती समिती आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी काम केले. अनेक वर्ष रेल्वेसाठी संघर्ष सुरू राहिला. दरम्यान, बीड रेल्वेचे स्वप्न आज पुर्ण होत आहे. आज अहिल्यानगर ते बीड रेल्वे सुरू झाली असून बीड ते परळीपर्यंत कामही गतीने सुरू आहे. रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय, मुख्यमंत्रीसाहेब आता बीडला २५ टिएमसी पाणी द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, बीडलाही पाणी आणू, असा शब्द यावेळी दिला. बीड येथील रेल्वे स्थानक येथे अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, खा.रजनीताई पाटील, आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, आ.नमीता मुंदडा, आ.काळे, माजी.आ.भिमराव धोंडे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यातील नागरिकांना रेल्वे येत असल्याचा आज आनंद होत आहे. अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत असून बीड रेल्वेसाठी कृती समितीने मोठे काम केले. यात नामदेवराव क्षीरसागर, हनुमंत उपरे, अमोल गलधर आदिंसह विविध क्षेत्रात काम करणाऱ्या जनतेने लढा उभा केला. त्याच मागणीचे आज आपण फलीत पाहत आहोत. मागील पन्नास वर्षांपासून आपण रेल्वेची मागणी करत होतो. आज रेल्वेची मागणी आणि स्वप्नही पुर्ण होत आहे. अहिल्यानगर ते परळी अशी रेल्वेची लांबी ही २६१ किलोमिटर आहे. त्यापैकी मार्च २०२४ पर्यंत ९९ किलोमिटर पुर्ण झाली आणि आपल्या कार्यकाळात आजपर्यंत ६७ लांबी पुर्ण झाली. ज्या दिवशी खासदार झालो, त्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेतली. तुमच्या सर्वांच्या आर्शीवादाने खासदार झाल्यानंतर मी सालगडी म्हणून काम करण्याचा प्रमाणिक प्रयत्न करत आहे. रेल्वे ट्रॅक टाकून घेण्यापासून प्रत्येक ठिकाणी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहे. आतापर्यंत १६ बैठका आपण घेतल्या. रेल्वे अधिकाऱ्यांपासून रेल्वेमंत्र्यांपर्यंत भेटत आहे. याच कारणाने आपल्या रेल्वेच्या कामाला गती मिळालेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्याला निधी देत आहेत. बीडकरांची बार्शीनाक्यावरील थांब्याची मागणी आहे, त्यासाठी आपला प्रस्ताव गेलेला आहे. रेल्वेमुळे विद्यार्थी, गोरगरिब आणि शेतकऱ्यांच्या मालाची ने-आण करण्यासाठी उपयोग होणार आहे. आता डिझेलवर रेल्वे सुरू होत आहे. परंतु हायस्पिड रेल्वे ही लाईटवर धावणार आहे. त्यासाठी आष्टी आणि सिरसाळा येथे दोन सबस्टेशन होत आहेत. ते काम लकवरच पुर्ण होईल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे तिजोरीचे मालक आहेत, ते या कामासाठी हात मोकळे सोडतीलच, असा विश्वास आहे. दरम्यान, मराठवाड्याचा पाण्याचा अनुशेष भरून काढा. आम्हाला उजनीतून २५ टिमएसी पाणी मांजरा धरणात द्या आणि तिथून ते मांजरसुंब्याला आणि, जेणेकरून आमच्या बीड जिल्ह्यात कायमस्वरूपी दुष्काळमुक्त होईल, असे खा.सोनवणे म्हणाले.

°     °

**खा.सोनवणेंना रेल्वेप्रवासाचा मान**

**बीडला रेल्वे आलीच पाहिजे, अशी मागणी वर्षानूवर्षे सुरू होती. अखेर ही मागणी आता पुर्ण झाली असून दि.१७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर अशी पहिली रेल्वे सुरू करण्यात आली. या पहिल्या प्रवाशी रेल्वेत खा.बजरंग सोनवणे यांनी प्रवास केला. त्यांच्यासोबत बीडमधील रेल्वेलढ्यात सहभागी झालेले नागरिक देखील सहभागी झाले होते.**

°     °

खा.सोनवणेंच्या पोस्टरने वेधले लक्ष

बीड येथील रेल्वे स्थानक येथील अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमात खा.बजरंग सोनवणे यांचे ‘कार्यक्षम खासदार’ असे लिहलेले पोस्टर तरूणांनी आणले होते. अगदी सर्व कार्यक्रमात या पोस्टरने लक्ष वेधून घेतले होते. कार्यक्रमांसह रेल्वे प्रवासातही तरूण असे पोस्टर घेवून फिरताना दिसले. कार्यक्रमांदरम्यान, पोस्टर हातात घेत खा.बजरंग सोनवणे तुम आगे बढोच्या घोषणांनी यावेळी तरूणांनी दिल्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १८ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण विकासाला नवसंजीवनी मिळणार

## उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे प्रतिपादन; काकडहिरा येथून पंचायतराज अभियानाचा शुभारंभ

बीड (प्रतिनिधी) दि.१७ : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान म्हणजे गावोगावी सर्वांगीण विकासाला नवी दिशा देणारी आणि स्पर्धात्मक विकासाला चालना देणारी एक मोठी लोकचळवळ आहे. या अभियानामुळे ग्रामीण विकासाला नवसंजीवनी मिळणार आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केला. बीड तालुक्यातील काकडहिरा येथे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा बुधवारी (दि.१७) शुभारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अजितदादा पवार हे बोलत होते. व्यासपीठावर श्रीक्षेत्र नारायणगडचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, माजी




कृषीमंत्री आ. धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, आ. विजयसिंह पंडित, माजी आमदार संजय दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधासनभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सरपंच प्रीतीताई बागलाने, कल्याण आखाडे, अविनाश नाईकवाडे, राजेश्वर चव्हाण, नारायणगड संस्थानचे विश्वस्त दिलीप भोसले तसेच शासनाचे विविध अधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, १७ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत हे अभियान राज्यभर चार पातळ्यांवर राबवले जाणार आहे. तालुका, जिल्हा, विभाग व राज्य अशा स्तरांवर ही स्पर्धा होणार असून, ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे आहे, असे पवार यांनी स्पष्ट केले. तसेच, ग्रामीण भागातील सर्वांनी मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. महिला सक्षमीकरण, ग्रामविकासासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असून, तुम्ही साथ दिलीत तर जिल्ह्याच्या विकासासाठी मी खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभा आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पांडुरंग सुतार यांनी केले तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी मानले.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गावाचा विकास गतीने होईल-प्रीती बागलाने

प्रास्ताविक सरपंच प्रीती अमोल बागलाने यांनी केले. त्यांनी अभियानाचे स्वरूप स्पष्ट करून ग्रामपंचायतीने आतापर्यंत केलेल्या विकासकामांचा उल्लेख केला. तसेच, पुढील काळात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गावाचा विकास अधिक गतीने केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### शासकीय योजनांच्या लाभाचे वितरण

शासकीय योजना लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व लाभवितरणाचा कार्यक्रम झाला. यात मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या कै. बापूसाहेब दगडू कवडे यांच्या पत्नी श्रीमती राणी बापूसाहेब कवडे यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून १० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच आयुष्यमान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. महिला बचत गटांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे कर्ज आणि स्वयंसहायता गटांना देखील धनादेश प्रदान करण्यात आले.

# उमापुर जिल्हा परिषद शाळेच्या समस्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निदर्शनास

उमापूर प्रतिनिधी: उमापुर जिल्हा परिषद शाळेतील शैक्षणिक व मूलभूत सुविधा संदर्भातील गंभीर समस्या पालकांनी एकत्र येऊन काल रात्री राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे मांडल्या. गावकऱ्यांच्या उपस्थितीत हा विषय उचलून धरला गेला. पालकांच्या निवेदनात पुढील मागण्या प्रमुख्याने होत्या : जवळपास १००० विद्यार्थ्यांची संख्या असूनही शाळेला क्लास-२ अधिकाऱ्याच्या दर्जाचा मुख्याध्यापक नाही. शाळेत बसविलेला पाणी फिल्टर बंद असल्याने विद्यार्थ्यांना अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे. एकाच दिवशी अनेक शिक्षक गैरहजर राहतात, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. विद्यार्थ्यांना दिला जाणारा आहार ताजा व पौष्टिक असावा. बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत, ते सुरू करावेत. स्वच्छतागृह व पाणीपुरवठा व्यवस्थेची सुधारणा व्हावी. उमापुर गावाची लोकसंख्या जवळपास २० हजार असली तरी आजवर केवळ २० जण शासकीय नोकरीत आहेत, हे गावाच्या शैक्षणिक मागासलेपणाचे निदर्शक असल्याचे पालकांनी सांगितले. पालकांनी सांगितले की, ङ्गगावात शिक्षणाच्या मूलभूत सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. आज शाळेच्या मुलांना योग्य शिक्षक, पाणी, पोषण आहार आणि सुरक्षित वातावरण मिळत नाही. ही परिस्थिती बदलावी हीच आमची अपेक्षा



आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पालकांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले व प्रशासनाला तातडीने तपासणी करून आवश्यक ती पावले उचलण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी पालकांना आश्वासन दिले की, ङ्गशिक्षणासारख्या मुलभूत गोष्टींमध्ये कोणतीही तडजोड होऊ दिली जाणार नाही. मुलांच्या हितासाठी आवश्यक निर्णय घेतले जातील. या प्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आमदार विजयसिंह पंडित, आमदार धनंजय मुंडे, बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्यासह अनेक अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# एसटी आरक्षणासाठी खांडवी तांड्यातील लहू राठोड यांनी केली आत्महत्या



बीड, ता.१७ :- अठराविश्व दारिद्र असलेल्या बंजारा समाज आपली पोटाच खळगी भरण्यासाठी ऊसतोडणी करून उदरनिर्वाह भागवत आहे. बाप ऊसतोडुन लेकरांचे शिक्षण करतो मात्र ओबीसीतील घुसखोरीमुळे पोराला नोकरी लागत नसल्याच्या नैराश्याने खांडवी तांडा येथील लहु धोंडिराम राठोड यांनी चिठ्ठी लिहून विद्युत वायरल धरून आत्महत्या केली आहे.गावकुसाबाहेर तांड्यावर राहून काबाड कष्ट करत जीवन भागविले जाते. मात्र दिवसरात्र ऊसतोडुन पोरांचे शिक्षण केले. अनेक वर्षांपासून पोर स्पर्धा परीक्षा सह पोलीस भरतीची तयारी करत होता मात्र दिवसेंदिवस ओबीसीमध्ये वाढत जाणारी घुसखोरीमुळे पोरांना नोकरी लागणे कठीण झाले. या नैराश्यातून खचून जात महाराष्ट्र सरकाने बंजारा समाजाला बंजारा एसटी पर्वग आरक्षण दिले असते तर पोरगं नोकरी लागून घरची दारिद्र्य परिस्थिती कमी झाली असते. यामुळे हैद्राबाद गॅझेटरप्रमाणे मराठवाड्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती पर्वगातून आरक्षण देण्यात यावे,अशी चिठ्ठी लिहून ठेवत चालू विद्युत वायरला धरून आत्महत्या केली.

# महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले



महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री नामदार श्रीमती पंकजाताई मुंडे या बीड येथे रेल्वे उद्घाटनाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यामध्ये आल्या असता तसेच बीड शहरांमध्ये डॉक्टर हंगे यांच्या दवाखान्याच्या उद्घाटनानिमित्त बीड शहरांमध्ये आल्या आसता त्यांची नगरसेवक मा विनोदजी मुळूक साहेब यांच्या निवासस्थानी भेट घेतली व त्यांचे महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले या वेळी पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब तसेच भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख तसेच भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे मा. सभापती मा. श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील सह उपस्थित असलेले भारतीय पार्टीचे मा. गणेश जी लांडे पाटील सह उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्स पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर मोठ्या उपस्थित होते .

# काम बोलता हैं..!ॲड शेख शफीक भाऊ यांनी दिलेला शब्द पाळला..! मोमीनपुरा भागातील लाईटच्या DP चं काम सुरू..!

बीड प्रतिनिधी :झालेल्या मुसळधार पावसामुळे मोमीनपुरा भागात नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरामध्ये घुसले होते. त्यामुळे परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. भागातील उद्भ बिघाड झाल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन अखचखच बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ



यांनी तात्काळ परिसराची पाहणी केली व संबंधित कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांचा प्रश्न त्वरित सोडविण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे आज बीड जिल्हा उपाध्यक्ष व तालुका अध्यक्ष



खन्ना भैय्या तसेच नगरसेवक मोमीन अजहर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्भ दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. या कामामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी ज्येष्ठ नेते सलाम शेठ, आमेर अघ, शेख सलमान, मोमीन शफीक यांच्यासह भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी या तातडीच्या कामासाठी ॲड. शेख शफीक भाऊ यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# टायगर राकेश जाधव यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा !

# गोरगरिबाची सेवा हीच खरी ईश्वर सेवा : राकेश जाधव

**25 शिलाई मशीन, 100 विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, 1001, नागरिकांचा एक लक्ष रुपयांचा अपघात विमा, महिला मातांना साडी वाटप, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, संपन्न**

बीड (प्रतिनिधी) टायगर ग्रुप महाराष्ट्राचे बीड जिल्हा अध्यक्ष राकेश अण्णा जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील नळवंडी नाका परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या वाढदिवसानिमित्त टायगर ग्रुप महाराष्ट्राचे अध्यक्ष पैलवान तानाजी भाऊ जाधव व मराठवाडा अध्यक्ष उमेश भाऊ पोखरकर यांच्यासह छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाध्यक्ष, लातूरचे जिल्हाध्यक्ष, मराठवाड्यातील पदाधिकारी यांच्यासह बीड जिल्ह्यातील टायगर ग्रुप चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी परिसरातील वंचित असलेल्या महिलांना तब्बल 25 शिलाई मशीन वाटप करण्यात आले, यासह 100 विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची पूर्ण किट, माता भगिनींसाठी साडी, रुग्णांसाठी आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, एक हजार नागरिकांचा एक लक्ष रुपयांचा अपघात विमा, रुग्णांसाठी रुग्णवाहिका, आदी समाज उपयोगी उपक्रमांनी राकेश अण्णा जाधव यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी टायगर ग्रुप चे अध्यक्ष पैलवान तानाजी भाऊ जाधव यांनी राकेश जाधव यांच्या कार्याचा गौरव केला टायगर ग्रुप नेहमीच राकेश जाधव यांच्या पाठीशी व चांगल्या काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या



पाठीशी उभी असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले, तसेच मराठवाडा अध्यक्ष उमेश भाऊ पोखरकर यांनीही आपले मत मांडताना टायगर ग्रुप सामाजिक कामात सदा अग्रेसर असणारी संघटना असून राकेश जाधव यांचे समाजकार्य हे स्वतःच्या स्वखर्चाने सुरु असून असे कार्यक्रम घेण्यास माणसाचे मोठे मन लागते टायगर ग्रुप नेहमीच राकेश जाधव यांच्या पाठीशी असणार असल्याची कबुली यावेळेस पोखरकर यांनी दिली. टायगर ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष जालिंदर भाऊ जाधव, राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव, उपाध्यक्ष भैय्यासाहेब बंडगर, मराठवाडा अध्यक्ष उमेश भाऊ पोखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विमा कवच, शैक्षणिक साहित्य, गोरगरिबांना मदत, रक्तदान, रुग्णवाहिका अर्पण यासह विविध कार्यक्रम करण्यात आले . यावेळी परिसरातील आसाराम भाऊ गायकवाड, स्वप्निल भैया गलधर, सचिन मुळूक, राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते भागवत तावरे, बाबरी मुंडे, विपुल गायकवाड, वीरेंद्र शेळके, संकेत ढोले, यांच्यासह मोठ्या प्रमाणात महिला तरुण व परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांची व टायगर ग्रुप महाराष्ट्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com